exh 1 cri m a no 404 2026
order pass bellow exh 1
put up for argument

दै.र.नं. /२०२६

दाखल दिनांक : २६.०२.२०२६

क्रि.किर.अर्ज नंबर 404 /२०२६

**मे.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीसो,कोल्हापूर**

**यांचे कोर्टात...**

Digitally signed by PANKAJ BHAGATSING RAJPUT
Date: 2026.03.16 17:50:36 +0530

| | |
|---|---|
| १. युवराज रामचंद्र वड्ड (हेर्लेकर)<br>वय वर्षे : ४३ , धंदा : व्यवसाय,<br>२. सार्थक युवराज वड्ड (हेर्लेकर)<br>वय वर्षे : १७ , धंदा : शिक्षण,<br>अ.पा.क. वडील अर्जदार नंबर १<br>दोघे रा. मु.पो. हेर्ले, ता.हातकणंगले,<br>जि.कोल्हापूर. | अर्जदार |

विरूद्ध

.. २ ..

१. विश्वप्रभा नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
कोल्हापूर, १३२०/२, सी वॉर्ड, लक्ष्मीपुरी,
कोल्हापूर.

२. सौ.सुनिता राजेंद्र शेटे
चेअरमन, विश्वप्रभा नागरी सहकारी
पतसंस्था मर्या. कोल्हापूर,
वय वर्षे : ४०, धंदा : घरकाम,
रा.३८१, ई वॉर्ड, माळी कॉलनी,
टाकाळा, कोल्हापूर.

३. श्री.अरविंद कन्हैयालाल जैन
व्हा.चेअरमन, विश्वप्रभा नागरी सहकारी
पतसंस्था मर्या. कोल्हापूर.
वय वर्षे : ४२, धंदा : व्यापार,
रा.प्लॉट नं.११, नारायणीनगर
को.ऑप.हौसिंग सोसा., महाडीक वसाहत,
मार्केट यार्ड, कोल्हापूर.

४. श्री.नरेंद्र कचरादास शहा (संचालक)
वय वर्षे : ४४, धंदा : व्यापार,
रा. १०६, शांती अपार्टमेंट,
१३ वी गल्ली, मंडलिक पार्क,
राजारामपुरी, कोल्हापूर.

५. श्री.सुधाकर हरी निर्मळे (संचालक)
वय वर्षे : ४३, धंदा : व्यापार,
रा.८१२, ख्रिश्चन शाळेजवळ,
हेर्ले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.

वि.प.

६. श्री.अनिल पांडुरंग मगदूम (संचालक)
वय वर्षे : ४४, धंदा : व्यापार,
रा. भुई गल्ली, ब्राह्मणमळा,
घुणकी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.

७. श्री.मुकेश विश्वनाथ माळी (संचालक)
वय वर्षे : ४७, धंदा : व्यापार,
रा.हेर्ले, ता.हातकणंगले,
जि.कोल्हापूर.

८. श्री.विवेकानंद दुंडय्या हिरेमठ (संचालक)
वय वर्षे : ४४, धंदा : व्यापार,
रा. चिंतामणी पार्क, रिंगरोड,
फुलेवाडी, कोल्हापूर.

९. श्री.दत्तात्रय बाळू भानसे (संचालक)
वय वर्षे : ४८, धंदा : व्यापार
रा.पट्टणकोडोली,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.

१०. श्री. श्रीनिवास भालचंद्र मिठारी (संचालक)
वय वर्षे : ४६, धंदा : व्यापार
रा. माधुरी बेकरी समोर,किर्तनकार बिल्डींग,
बिंदू चौक, कोल्हापूर.

११. सौ.दक्षा अभिनव शेटे (संचालिका)
वय वर्षे : ४०, धंदा : घरकाम
रा.३८१, ई वॉर्ड,
माळी कॉलनी, टाकाळा, कोल्हापूर.

वि.प.

| | | |
|---|---|---|
| १२. | श्री.निलेश आप्पासो माळगी (संचालक)<br>वय वर्षे : ४५, धंदा : व्यापार,<br>रा. ११८२, ई वॉर्ड,<br>पी.डब्ल्यू.डी. हौसिंग सोसायटी,<br>बिल्डींग नं.३, टाकाळा, कोल्हापूर. | वि.प. |
| १३. | श्री.विक्रांत विजय आचरेकर<br>मॅनेजर, विश्वप्रभा नागरी सहकारी पतसंस्था<br>मर्या.कोल्हापूर.<br>वय वर्षे : ४९, धंदा : नोकरी<br>रा. ब्लॉक नं.२, सी वॉर्ड,<br>लक्ष्मीपुरी, कोल्हापूर. | |

**भारतीय न्यायसंहिता कलम**
**१७५ खालील अर्ज...**

**यातील अर्जदार मे.न्यायालयांस नम्रपणे कळवितात की,**

१. यातील अर्जदार नं.१ व २ हे वर नमूद पत्त्यावर कायमपणे रहिवासी असून अर्जदार नं.१ हे वैद्यकीय व्यवसाय करतात व अर्जदार नं.२ हे शिक्षण घेत आहेत.

२. यातील वि.प.नं.१ ही महाराष्ट्र राज्य सहकार कायद्याखाली नोंद असलेली सहकारी तत्त्वावरील संस्था असून तिचे नोंदणीकृत कार्यालय १३२०/२, सी, लक्ष्मीपुरी येथे असून तिचा नोंदणी क्र.केपीआर/के.व्ही.आर./आ.एस.आर.(सी.आर.) २३३८/२०००-२००१ दिनांक १६.०२.२००१

असून यातील वि.प.क्र.२ ते १२ हे वि.प.क्र.१ संस्थेचे संचालक मंडळ सदस्य असून वि.प.क्र.१३ हे सदर वि.प. क्र.१ संस्थेचे मॅनेजर म्हणून काम पाहत आहेत. वि.प.क्र.१ संस्थेचे दैनंदिन कामकाज हे वि.प.क्र.२ ते १३ हे पाहत असतात, त्याकारणे त्यांना प्रस्तुत कामी वि.प. केलेले आहे. वि.प.क्र.१ संस्थेवर महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याचे नियंत्रण असते.

३. वि.प. क्र.१ संस्थेचा कारभार हा सहकार खात्याने मंजूर केलेल्या उपविधीनुसार चालतो. वि.प.क्र.१ संस्थेची उद्दिष्टये ही प्रामुख्याने समाजातील व्यक्तींना सभासद करून घेणे, त्यांचेकडून ठेवी स्वीकारणे, त्यावर व्याज देणे तसेच सभासदांना त्यांची पत पाहून त्यांना कर्जपुरवठा करणे इ. प्रमाणे आहेत. वि.प.क्र.१ संस्थेचे दैनंदिन कामकाज हे जसे की, ठेवी स्वीकारणे, व्यवसाय करणे इ. प्रमाणे वि.प.क्र. २ ते १३ हे पाहत असतात व तसे कामकाज पाहण्याचे अधिकार हे वि.प.क्र.१ संस्थेने वि.प.क्र. २ ते १३ यांना संचालक मंडळ महोदय मिटींग मध्ये ठराव करून ठरावाने दिलेले असतात व त्याप्रमाणे ते वि.प.क्र.१ संस्थेकरिता काम पाहत असतात.

४. वि.प.क्र.१ ही सहकारी तत्वावरील बँकिंग व्यवसाय करणारी संस्था असलेने दर आर्थिक सालात शासकीय लेखापरिक्षक कार्यालय यांचेमार्फत वि.प.क्र.१ संस्थेचे लेखापरिक्षण करून घेणे हे वि.प.क्र.२ ते १३ यांचेवर कायद्याने बंधनकारक आहे. शासकीय लेखापरिक्षण अथवा वार्षिक लेखापरिक्षण न झालेस वि.प. यांचेवर कारवाई करणेचे अधिकार सहकार कायद्याने सहकार खात्यास प्रदान केले आहे.

५. वि.प.क्र.१ ही जनतेकडून ठेवी स्वीकारणेचा व्यवसाय करीत असलेने त्याची

माहिती अर्जदारांना मिळालेनंतर अर्जदारांनी त्यांचे कष्टातून मिळविलेल्या रक्कमेतून अर्जदार क्र.१ यांनी वि.प. यांचेकडे ठेव पावती क्र. १८६०१, याद्वारे ठेव रक्कम रु.४९,११३/- तसेच ठेव पावती क्र.१८९४७ द्वारा ठेव रक्कम रु.४०,०००/- तसेच अर्जदार क्र.२ यांनी ठेव पावती क्र.१७७४३ द्वारा रक्कम रुपये २०,०००/- व १७७४४ द्वारा रक्कम रुपये ४४,०००/- अशी ठेव रक्कम वि.प.क्र.१ संस्थेमध्ये ठेवली आहे. ठेव रक्कम ठेवलेबाबत वि.प. यांनी अर्जदारास दिलेल्या ठेव पावत्या अर्जदाराने या मे.न्यायालयासमोर आज रोजी स्वतंत्र कागदपत्र यादीने मे.न्यायालयांत दाखल केलेले आहे.

६. अर्जदारांना वि.प.क्र.१ संस्थेत ठेव ठेवलेल्या ठेव रक्कमांची कौटुंबिक गरजेकरिता आवश्यकता असलेने अर्जदारांनी सदरच्या ठेव पावत्यांवरील रक्कम माहे १०/२०२५ पासून वेळोवेळी वि.प.क्र.१ ते १३ यांचेकडे मागणी केलेली आहे. परंतु वि.प. क्र.१ ते १३ यांनी आजअखेर अर्जदारास त्यांच्या ठेव ठेवलेल्या ठेव पावत्यांवरील रक्कम अर्जदारांना कोणत्याही योग्य व सबळ कारणाशिवाय परत दिलेल्या नाहीत. आजही ठेव पावत्यांवरील रक्कमा वि.प.क्र.१ ते १३ यांचेकडे तशाच आहेत. कायद्याने ठेवीदाराने ठेवीची रक्कम मागणी केलेस, ती त्यांना तातडीने परत देणे हे वि.प. यांचेवर कायद्याने बंधनकारक आहे. कोणाचीही ठेव रक्कम अडवून ठेवणेचा वि.प. यांना कायद्याने अधिकार नाही.

७. वि.प. हे अर्जदारांनी वेळोवेळी ठेव रक्कम मागणी करूनही देत नसलेने व वि.प. हे अर्जदारांची संगनमताने फसवणूक करत असलेने वि.प. हे MPID कायद्याचा भंग करत असलेने त्या बाबत अर्जदारांनी दिनांक २०.११.२०२५

इ. रोजी वि.प.यांचे विरूद्ध ऑनलाईन तक्रार पोलीसांकडे दाखल केली. परंतु त्या तक्रारीची कोणतीही दखल कोणीही आजतागायत घेतली नाही. त्यानंतर अर्जदाराने मा.विशेष पोलीस महानिरीक्षकसो, कोल्हापूर यांचेकडे दिनांक २३.११.२०२५ इ. रोजी ई–मेल द्वारा वि.प.क्र.१ ते १३ हे संगनमताने ठेव ठेवलेल्या पावत्यांवरील रक्कम देत नसलेबाबत तक्रार दाखल केली. परंतु त्या तक्रारीचीही मा.विशेष पोलीस महानिरीक्षकसो यांनी कोणतीही दखल घेतली नाही. त्याकरिता अर्जदाराने दिनांक ०१.१२.२०२५ इ. रोजी पुन्हा दिनांक २३.११.२०२५ इ. रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षकसो, कोल्हापूर यांचेकडे रिमाईंडर ई–मेल केला. परंतु त्याचीही दखल मा.विशेष पोलीस महानिरीक्षकसो यांनी घेतली नाही. त्यानंतर पुन्हा दिनांक ०६.१२.२०२५ रोजी दुसऱ्यांदा दिनांक २३.११.२०२५ इ. रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने रिमाईंडर ई–मेल केला. परंतु वेळोवेळी ऑनलाईन तसेच ई–मेल द्वारा तसेच प्रत्यक्ष तक्रारी पोलीस खात्याकडे अर्जदाराने करूनही अर्जदारांचे तक्रारीबाबत आजतागायत कोणतीही कारवाई लक्ष्मीपुरी पोलीस स्टेशन कोल्हापूर अथवा पोलीस अधिक्षकसो कोल्हापूर, आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा, कोल्हापूर अथवा विशेष पोलीस महानिरीक्षकसो कोल्हापूर यांचेकडून झालेली नाही व वि.प. यांचेविरूद्ध कोणताही गुन्हा आजपर्यंत दाखल झालेला नाही अथवा अर्जदारांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीही चौकशी पोलीस खात्यामार्फत करण्यात आली नाही. वि.प.क्र.१ ते १३ यांनी संगनमताने फसवणुकीसारखा गंभीर गुन्हा केलेला असतानाही त्याची कोणतीही दखल पोलीस खात्याने आजतागायत घेतलेली नाही. आजही वि.प.क्र. २ ते १३ हे बिनधास्तपणे समाजात वावरत आहेत.

८. वि.प. यांचे विरूद्ध ठेवीदारांच्या संरक्षण कायद्यातील तरतुदींचा आधार घेऊन व त्या कायद्यातील कलमांद्वारे पोलीस तपास करून गुन्हा वि.प. यांचेवर दाखल करत नाहीत, करिता वि.प. यांचेवर फसवणूक तसेच ठेवीदारांचे पैसे परत देत नसलेने MPID कायद्यान्वये वि.प. यांची लक्ष्मीपुरी पोलीस स्टेशन कोल्हापूर यांचेमार्फत चौकशी होवून वि.प.क्र. १ ते१३ यांचेवर गुन्हा नोंद होवून मिळणेकरिता अर्जदारास प्रस्तुतचा अर्ज या मे.न्यायालयांत दाखल करणे भाग पडले आहे.

९. अर्जदाराने प्रस्तुत अर्जास योग्य त्या रक्कमेचा कोर्ट फी स्टॅम्प लावलेला आहे.

१०. अर्जदाराने अशाच स्वरूपाचा अर्ज भारतातील अन्य कोणत्याही न्यायालयांत दाखल केलेला नाही.

११. मे.न्यायालयांत प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेपूर्वी अर्जदाराने वि.प. यांचेविरूद्ध गुन्हा दाखल होणेकरिता ऑनलाईन द्वारा तसेच प्रत्यक्ष तक्रारी दिल्या होत्या. परंतु त्या तक्रारीची कोणतीही दखल पोलीसांनी घेतली नसल्याने अर्जदारांना प्रस्तुतचा अर्ज मे.न्यायालयांत दाखल करणे भाग पडले आहे.

१२. <u>सबब, अर्जदार यांची विनंती की</u> :

प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत यावा आणि वर नमूद अर्जाचे कलम १ ते ८ तसेच या सोबत जोडलेल्या कागदपत्रांचा विचार होवून वि.प.क्र.१ ते १३ यांनी संगनमताने केलेल्या गुन्ह्याची चौकशी करणेबाबत मे.पोलीस

निरीक्षकसाो, लक्ष्मीपुरी पोलीस स्टेशन यांना आदेश करणेत यावेत ही विनंती.

येणेप्रमाणे आदेश व्हावा ही विनंती.

कोल्हापूर.

दिनांक : २६.०२.२०२६ (अर्जदार नं.१ स्वतःकरिता व अर्जदार नं.२ करिता अ.पा.क.वडील)

-: प्रतिज्ञा :-

आम्ही यातील अर्जदार नं.१ स्वतःकरिता व अर्जदार नं.२ करिता अ.पा.क. वडील सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील तसेच त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांतील संपूर्ण मजकूर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम कोल्हापूर.

कोल्हापूर.

दिनांक : २६.०२.२०२६ (अर्जदार नं.१ स्वतःकरिता व अर्जदार नं.२ करिता अ.पा.क.वडील)

यांसी साक्षीदार :

१. अर्जदार स्वतः

२. अर्जदाराने ठेवलेल्या ठेव पावत्या.

३. अर्जदारांनी आर्थिक गुन्हा अन्वेषण शाखेकडे दिलेला तक्रार अर्ज.

४. अर्जदाराने पोलीस अधीक्षक कार्यालयात ऑन लाईन दाखल केलेली तक्रार.

५. अर्जदाराने विशेष पोलीस महानिरीक्षकसाो, कोल्हापूर परिक्षेत्र यांचे कार्यालयात ई-मेल द्वारा केलेली तक्रार.

६. वरील तक्रारीच्या अनुषंगाने केलेले रिमाईंडर

७. पुन्हा दिनांक २३.११.२०२५ इ. रोजी दुसऱ्यांदा केलेले रिमाईंडर

८. जरूरीप्रमाणे अन्य साक्षीदार तपासणीस परवानगी असावी.